सकाळ कोल्हापूर, गुरुवार, २५ ऑक्टोबर २०१८

'शिवराज'च्या शीतल पाटीलला सुवर्ण

आंतरविभागीय महिला कुस्ती; पल्लवीला रौप्य तर शुभांगीला कास्य

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय मॅटवरील मुलींच्या कुस्तीमध्ये येथील शिवराज महाविद्यालयाची विद्यार्थिनी शीतल पाटील हिने ५९ किलो गटात सुवर्णपदक पटकावले. साताऱ्याच्या शिवाजी कॉलेजची पल्लवी जाधवने रौप्य तर पाटणच्या बी.डी.सी. कॉलेजची शुभांगी पाटीलने कास्य पदकावर मोहोर उमटवली. शिवराज महाविद्यालयाने स्पर्धेचे संयोजन केले होते.

गडहिंग्लज : आंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धेतील विजेत्या मल्लांना बक्षीस वितरण प्रसंगी प्रा. किसनराव कुराडे, विश्वास खोत, प्रकाश पोवार, अशोक कदम आदी.

शिवराज संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. प्रा. राहुल मगदूम यांनी स्वागत केले. प्रा. अनिल कुराडे, ॲड. दिग्विजय कुराडे, शंकरराव नंदनवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आण्णासाहेब पाटील, सखाराम मोहिते, शामराव नदाफ, जानबा कुपटे, बाजीराव पाटील, दिलीप पवार,भाऊसाहेब पाटील, के.आर.गावडे आदी उपस्थित होते.

सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील स्पर्धक सहभागी झाले होते. पंच शंकर कुरळे, रवींद्र डोंगरे, अशोक कदम, प्रकाश धबाले, विठ्ठल भम्मानगोळ, सागर शिंदे, उमेश रामजी, प्रभाकर खांडेकर, जयवंत पाटील, विश्वास खोत, प्रकाश पोवार आदीसह लाल आखाडा, हनुमान आखाडा लिंगनूर व नूल, पाटील आखाडा मुत्नाळ, कडगाव व्यायाम शाळेच्या कार्यकर्त्यांचे सहकार्य मिळाले.

स्पर्धेचा गटनिहाय निकाल असा : ७६ किलो गट- स्वाती पाटील (केबीपी इस्लामपूर), सुकन्या खामकर (शिवराज गडहिंग्लज), वैष्णवी पाटील (वायसी वारणानगर), ७२ किलो - ऋतुजा शिंदे (विवेकानंद कोल्हापूर), प्रियांका दुबले (आदर्श, विटा), ६८ किलो-दिव्या कुंभार (वाय.सी. पाचवड), अपूर्वा पाटील (पीव्हीपी बुधगाव), धनश्री पाटील (केबीपी इस्लामपूर), ६५ किलो-जस्मिन शेख (शिवाजी, सातारा), स्मिता माळी (केडब्ल्यूसी सांगली), ६२ किलो- विजया पुजारी (इचलकरंजी), हर्षदा चव्हाण (एसजीएम कराड), प्रांजली कोळपे (शिंदे कॉलेज, वाई), ५७ किलो- प्रेरणा गायकवाड (आदर्श, विटा), शिवानी पाटील (विवेकानंद कोल्हापूर), अश्विनी यादव (केबीपी इस्लामपूर), ५५ किलो- प्रज्ञा बरकाळे (केएच गारगोटी), अमृता गायकवाड (केबीपी इस्लामपूर), संध्याराणी सावंत (इस्लामपूर), ५३ किलो - सवाती शिंदे (मंडलिक, मुरगूड), विजया पोवार (घाळी गडहिंग्लज), ५० किलो-एकता पाटील (शहाजी कोल्हापूर), शिवानी सुतार (आदर्श विटा), कोमल जाधव (कमला कोल्हापूर).

तरुण भारत
गुरुवार, २५ ऑक्टोबर २०१८

विवेकानंदमध्ये सामाजिक समस्या विषयाच्या भित्तीपत्रकांचे उद्घाटन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये 'सामाजिक समस्या" या विषयावरील भित्तीपत्रकाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते झाले. समाजशास्त्र विभागातर्फे या उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये २० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सामाजिक समस्या या विषयावर विद्यार्थ्यांनी स्त्रीभ्रूण हत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, फेसबुकचे फायदे-तोटे आदी भित्तीपत्रकांचे साद-रीकरण केले. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. डॉ. आर. पी. चव्हाण, प्रा. विकास मस्के आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सुषमा कांबळे यांनी केले. अमृता पोवार यांनी आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, २५ ऑक्टोबर २०१८

'विवेकानंद'मध्ये भित्तीपत्रिकेचे अनावरण

कोल्हापूर टाइम्स टीम

विवेकानंद कॉलेजमध्ये समाजशास्त्र विभागामार्फत प्रचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते 'सामाजिक समस्या' या विषयावरील भित्तीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले.

विभागातील दहा विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रिका तयार केली. स्त्रीभ्रूण हत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सोशल मीडियाचे फायदे-तोटे, पर्यावरणपूरक गणेशोत्सव आदी विषयांचा समावेश भित्तीपत्रिकेत केला आहे. भित्तीपत्रकातून विद्यार्थ्यांनी सामाजिक समस्यांचे दर्शन योग्य पद्धतीने घडविण्यासह त्यावरील उपाय सुचविले आहेत.

यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. डॉ. आर. पी. चव्हाण, प्रा. विकास मस्के यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सुषमा कांबळे या विद्यार्थिनीने प्रास्ताविक केले, तर अमृता पोवार हिने आभार मानले.

पुढारी | गुरुवार २५ ऑक्टोबर २०१८

गडहिंग्लजची शीतल सुवर्णपदकाची मानकरी

विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती; सातारला रौप्य, पाटणला कांस्यपदक

गडहिंग्लज : प्रतिनिधी

येथे शिवराज महाविद्यालयात आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलींच्या मॅटवरील कुस्ती स्पर्धेत ५९ किलो गटात यजमान शिवराज महाविद्यालयाच्या शीतल पाटील हिने सुवर्णपदकावर नाव कोरले. सातारच्या छ. शिवाजी कॉलेजच्या पल्लवी जाधव, बीडीसी, पाटण कॉलेजच्या शुभांगी पाटील यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक प्राप्त केले.

'शिवराज'चे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. संस्था सीईओ प्रा. अनिल कुराडे, संचालक ॲड. दिग्विजय कुराडे, शंकरराव नंदनवाडे, ज्येष्ठ मल्ल सखाराम मोहिते, शामराव नदाफ, जानबा कुपटे यांची उपस्थिती होती. नऊ गटांत पार पडलेल्या या स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील कुस्तीपटूंनी सहभाग नोंदविला. बहुतांश सामने अटीतटीचे झाले.

गटनिहाय विजेते असे : ७६ किलो गट - स्वाती पाटील (केबीपी, इस्लामपूर), सुकन्या खामकर (शिवराज, गडहिंग्लज), वैष्णवी पाटील (वायसी कॉलेज, वारणानगर). ७२ किलो - ऋतुजा

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेतील विजेत्यांसह प्रा. किसनराव कुराडे व मान्यवर.

शिंदे (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), प्रियांका दुबुले (आदर्श कॉलेज, विटा), ६८ किलो - दिव्या कुंभार (वायसी कॉलेज, पाचवड), अपूर्वा पाटील (पीव्हीपीआय, बुधगाव), धनश्री पाटील (इस्लामपूर). ६५ किलो - जस्मिन शेख (छ. शिवाजी कॉलेज, सातारा), स्मिता माळी (केडब्ल्यूसी, सांगली), ६२ किलो - विजया पुजारी (नाईट कॉलेज, इचलकरंजी), हर्षदा चव्हाण (एसजीएम, कराड), प्रांजली कोळपे (शिंदे महिला कॉलेज, वाई), ५७ किलो - प्रेरणा गायकवाड (आदर्श कॉलेज, विटा), शिवानी पाटील (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), अश्विनी यादव (केबीपी, इस्लामपूर), ५५ किलो - प्रज्ञा बरकाळे (केएच कॉलेज, गारगोटी), अमृता गायकवाड (इस्लामपूर), संध्याराणी सावंत (इस्लामपूर), ५३ किलो - स्वाती शिंदे (मंडलिक कॉलेज, मुरगूड), विजया पोवार (घाळी कॉलेज, गडहिंग्लज), ५० किलो - एकता पाटील (शहाजी कॉलेज, कोल्हापूर), शिवानी सुतार (आदर्श कॉलेज, विटा), कोमल जाधव (कमला कॉलेज, कोल्हापूर).

पंच म्हणून शंकर कुरळे, रवींद्र डोंगरे, अशोक कदम, प्रकाश धबाले, विठ्ठल भमानगोळ, सागर शिंदे, उमेश रामजी, प्रभाकर खांडेकर, प्रा. जयवंत पाटील, विश्वास खोत, प्रकाश पोवार यांनी काम पाहिले.

यावेळी विद्यापीठ निवड समितीचे अध्यक्ष प्रा. बाजीराव पाटील, प्रा. दिलीप पवार, प्रा. भाऊसाहेब पाटील, प्रा. के. आर. गावडे आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तीपत्रिकेचे अनावरण

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विवेकानंद कॉलेजच्या समाजशास्त्र विभागातर्फे 'सामाजिक समस्या' या विषयावरील भित्तीपत्रिकेचे अनावरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. भित्तीपत्रिका तयार करण्यासाठी दहा विद्यार्थी आणि विद्यार्थिनीनी सहभाग घेतला.

त्यांनी स्त्री भ्रूणहत्या, शेतकरी आत्महत्या, फेसबुकचे फायदे तोटे, पर्यावरणपूरक गणेशोत्सव आदी विषयावर भित्तीपत्रिका तयार केल्या आहेत. यावेळी समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. आर. पी. चव्हाण, प्रा. विकास म्हस्के यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सुषमा कांबळे हिने केले, आभार अमृता पोवार हिने मानले.

लोकमत कोल्हापूर, गुरुवार, दि. २५ ऑक्टोबर २०१८

विवेकानंद एन.सी.सी. छात्रांचे यश

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील एन. सी. सी. छात्रांनी दिल्ली येथे झालेल्या थल सैनिक कॅम्प (टीएससी)मध्ये सहभागी घेऊन उत्कृष्ट कामगिरी केली. या कॅम्पमध्ये महाविद्यालयातील सार्जंट अपेक्षा पाटील (बी. एस्सी. तीन मायक्रो), कॅडेट सुप्रिया संकपाळ (बी. एस्सी २), कॅडेट प्रतीक्षा पाटील (बी. ए. भाग २) यांचा समावेश होता. कॅम्पमध्ये मॅप रीडिंग, हेल्थ अँड हायजिन, टेंट पिचिंग, जजिंग डिस्टेन्स, इत्यादी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविले होते. यांना ६, महाराष्ट्र गर्ल्स बटालियन, एन. सी. सी. कोल्हापूर, कर्नल जे. पी. सायकिया, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, एन. सी. सी. प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट डॉ. एस. जी. गावडे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

रोलर हॉकी स्पर्धेसाठी 'न्यू मॉडेल'ची निवड

कोल्हापूर : नंदूरबार येथील के. डी. गावित सैनिक विद्यालय (पथराई) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रोलर हॉकी स्पर्धेसाठी न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची निवड झाली.या संघात यश कांबळे, राजवर्धन मगदूम, नौमान कौतवाल, समर्थ माळी, विनय चौगले, जय खद्रे, कैफ काझी, प्रथमेश मोहिते, सुयश वडके, यश पाटील, सुजल पाटील, ओम तिवारी यांचा समावेश आहे. या संघाला संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांचे प्रोत्साहन, तर एस. जे. मगदूम, क्रीडाशिक्षक महेश कदम, एल. बी. अंगज, एस. एन. कुराडे यांचे मार्गदर्शन लाभले.